**दिवाणी दावा क्र.७३/२०१२**
अनुसया थोरात वि. बाळकृष्ण नाडर
नि.क्र. १६० व १७८ वरुन

**<u>वादीतर्फे साक्षीदार क्र.१ नामे अनुसया रिचर्ड थोरस यांचा शपथेवर पुढील उलटतपास प्रतिवादी क्र.३ यांचे विधीज्ञ श्री. एस.यु.माविनकुर्वे यांचेमार्फत</u>**

**१.** माझ्या आईचे नाव मेरी ऑरीकस्वामी फ्रॅन्सीस आहे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ ही माझी सख्खी बहिण आहे. आम्ही एकुण चार बहिणी अॅजीलीना फ्रॅक, मी स्वतः, फ्लॉरी बालन नडर व विमल ऑरीकस्वामी फ्रॅन्सीस (मयत ) आहोत. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हे माझी बहिण लॉरी हिचे पती आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या आईला लिहिता वाचता येत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, आमचे वडील आम्ही लहान असतानाच वारले होते. माझे वडील मयत झाले त्यावेळी माझे वय ९ ते १० वर्षाचे होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ ही माझी मोठी बहिण असल्याने वडील मयत झाल्यानंतर प्रतिवादी क्र.३ व आई असे मिळुन भाजी विक्रीचा व्यवसाय करुन आमचा सांभाळ करत असत. माझे आजी आजोबा हे देखील आमच्या सोबत राहायचे. माझी चुलत बहिण रेजिना ही देखील आमचेसोबत राहायची व टेलरींगचा व्यवसाय करायची. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडिलांचे भाऊ हे आम्हास पैसे पाठवायचे.

**२.** माझी चुलत बहिण रेजिनाच्या पतीमुळे प्रतिवादी क्र.३ ला नोकरी लागली होती याबाबत मी काही नाही सांगु शकत. हे म्हणणे खरे आहे की, माझे आईकडे भाजी विक्री करणेव्यतिरिक्त इतर कोणताही अर्थिक स्त्रोत नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.३ यांना जॉय आईस्क्रीम याठिकाणी नोकरी लागली त्यानंतर माझी आई देखील प्रतिवादी क्र.३ सोबत दिप बंगला चौक या परीसरात राहु लागली. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर माझी दहावी झाली व त्यानंतर ससुन रुग्नालय येथे माझे नर्सचे प्रशिक्षण पुर्ण केले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर मला जीटी हॉस्पीटल बॉम्बे येथे नोकरी लागली. त्यावेळी मी पुर्ण प्रशिक्षित नर्स म्हणुन कार्यरत असल्याने माझ्या पगाराची पुर्ण रक्कम येण्याजाण्याचा खर्च सोडुन घरी देत असत. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मला मिळत असलेला पगार मलाच पुरत नसल्याने मी घरी पगार देत नव्हते. हे म्हणणे

खरे नाही की, माझी आई प्रतिवादी क्र.३ हिचे सोबत राहत असल्याने आईचा पुर्ण खर्च प्रतिवादी क्र.३ करत होती. हे म्हणणे खरे आहे की, जॉय आईस्क्रीम याठिकाणी प्रतिवादी क्र.३ हिचे सांगणेवरुन फ्लोरी व विमल या दोघी बहिनींनादेखील नोकरी मिळाली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझा पहिला विवाह नारायण यांच्याशी झाला होता. हे म्हणणे खरे आहे की, नारायण सोबतचा माझा घटस्फोट झाला असुन तो घटस्फोट ॲडव्होकेट मोहनराव डोंगरे यांनी करुन दिलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी विधिज्ञांच्या घटस्फोटाची फिस ही देखील माझी प्रतिवादी क्र.३ यांनी दिले होते.

**३.** हे म्हणणे खरे आहे की, माझा दुसरा विवाह सन १९८६ साली झाल्यानंतर मी एकटीच मस्कट येथे दुस-या देशात राहण्यास गेले. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.३ हिने मस्कट येथे जाण्याकरीता मला पैसे दिले. हे म्हणणे खरे आहे की, मी मस्कट येथे गेल्याचे आठ महिन्यानंतर परत भारतात आले. हे म्हणणे खरे नाही की, मी ज्यावेळी मस्कट येथे गेले त्यावेळी माझे पती माझी आई व प्रतिवादी क्र.३ हे एकत्र राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझे पतीला नोकरीला नसल्याने ते माझी आई व प्रतिवादी क्र.३ यांचे सोबत राहते होते व प्रतिवादी क्र.३ ही माझ्या पतीला पैसे देत होती. मी मस्कट येथुन परत आलेनंतर निगडी येथे राहणेसाठी घर घेतले होते.

**४.** हे म्हणणे खरे आहे की, सन १९८९ मध्ये माझे पती मनाली हॉटेलमध्ये स्टीवड म्हणुन काम करत होते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, माझे पतीने दोन महिने मनाली हॉटेल मध्ये काम केले त्यापुर्वी ते फॅब्रीकेशनचे काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, मी मस्कट येथुन परत आल्यानंतर गर्भवती रहिले व सन १९८७ मध्ये मला मुलं झाले. मला तीन अपत्ये झाली त्यापैकी पहिले अपत्य सन १९८७ साली,दुसरे अपत्य सन १९८९ व तिसरे अपत्य १९९५ मध्ये झाले. हे म्हणणे खरे नाही की, माझे दुसरे अपत्य मोठे होईपर्यंत कोणतेही काम करत नव्हते. साक्षीदार स्वतःहुन सांगते की,त्यावेळी मी रुबीहॉल रिसर्च हॉस्पीटल येथे काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९८८ पुर्वी पर्यंत आम्ही भाड्याचे घरात राहत होतो स्वतःचे घर नव्हते.

**५.** माझी बहिण प्रतिवादी क्र.३ ही ए.एन.जनरल ट्रेडी या भागीदारी संस्थेत भागीदार म्हणुन कार्यरत होती याबाबत मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझी आई प्रतिवादी क्र.३ हिचे सोबतच सन १९८७-८८ सालामध्ये दिप बंगला चौक येथेच राहत होती. साक्षीदार स्वतःहुन सांगते की, त्यावेळी मी रेंज हिलस्, एच टाईपमध्ये दोन रुम भाड्याने घेतले होते त्याठिकाणीच प्रतिवादी क्र.३, तिचा मुलगा व माझी आई हे माझे कडेच राहत होते.

**दोन्ही विधिज्ञांच्या तोंडी विंनती वरुन उलटतपास पुढीलतारखेपर्यंत तहकुब.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

sd/-

पिंपरी, पुणे
दिनांक :-२५.११.२०२४

(श्रीमती. एस.एस.चव्हाण )
**२ रे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**पिंपरी, जि. पुणे.**